# संगीतविश्वाची 'आशा' मावळली

**मुंबई । किसान न्युज**

९०० पेक्षा अधिक चित्रपटांमध्ये १२ हजारांहून अधिक गाणी गाऊन संगीतविश्व समृद्ध करणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे मुंबई येथील रुग्णालयात निधन झाले. शनिवारी हृदयविकाराचा त्रास जाणवल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या निधनाने देशाने एक अद्वितीय आणि अष्टपैलू गायिका गमावली आहे. आशाताईंनी आपल्या गायन कारकिर्दीची सुरुवात 'माझा बाळ' या चित्रपटातून केली. १९५०च्या दशकात त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले; मात्र त्या काळात लता मंगेशकर, शमशाद बेगम आणि गीता दत्त यांसारख्या दिग्गज गायिकांचे वर्चस्व होते. या स्पर्धात्मक वातावरणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे हे मोठे आव्हान त्यांनी जिद्दीने स्वीकारले आणि त्यावर यशस्वी मात केली. १९५७-५८ या काळात त्यांना सचिन देव बर्मन यांच्याकडे गाण्याची संधी मिळाली. कालाबाजार, लाजवंती, नौ दो ग्यारह, चलती का नाम गाडी, सुजाता यांसारख्या चित्रपटांतील गाण्यांनी त्यांच्या कारकिर्दीला नवे वळण मिळाले. पुढील पाच दशके त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टी गाजवली. ओ. पी. नय्यर यांच्यासोबतची त्यांची जोडी विशेष गाजली. 'आँखों से जो उतरी है दिल में', 'जाइये आप कहाँ', 'वो हसीन दर्द दे दो', 'चैन से हमको कभी' ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. तसेच राहुल देव बर्मन यांच्यासोबत 'पिया तू अब तो आजा', 'दम मारो दम', 'जाने जा' यांसारख्या गाण्यांनी त्यांच्या आवाजाचा आधुनिक आणि वेगळा पैलू उलगडला. १९८१ मधील 'उमराव जान' चित्रपटातून त्यांनी गझल गायिका म्हणूनही स्वतःची छाप पाडली. 'दिल चीज क्या है' या गाण्यासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यानंतर 'इजाजत' चित्रपटातील 'मेरा कुछ सामान' या गीतालाही राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले. हिंदीबरोबरच मराठी संगीत क्षेत्रातही त्यांचे योगदान अतुलनीय आहे. सुधीर फडके, हेमंत कुमार, सुरेश वाडकर, अनुराधा पौडवाल यांच्यासह त्यांनी अनेक अजरामर गाणी दिली. 'तरुण आहे रात्र अजुनी', 'जिवलगा राहिले रे दूर', 'ही वाट दूर जाते', 'फुलले रे क्षण माझे' अशा असंख्य गीतांनी मराठी रसिकांच्या मनात कायमचे स्थान मिळवले. बा. भ. बोरकर, ग. दि. माडगुळकर, शांता शेळके, सुरेश भट यांच्या कवितांना त्यांनी सुरेल साज चढवला. लावणीपासून गझल, भावगीत, भजन अशा सर्व प्रकारांमध्ये त्यांनी अप्रतिम कामगिरी केली. आशा भोसले यांनी मोहम्मद रफी, किशोर कुमार यांसारख्या दिग्गज गायकांसोबत असंख्य गाणी गायली. तसेच ए. आर. रहमान यांच्यासारख्या नव्या पिढीतील संगीतकारांसोबतही त्यांनी काम केले. त्यांनी १४ भाषांमध्ये सुमारे १२ हजारांहून अधिक गाणी गायली असून जवळपास ९०० चित्रपटांशी त्या जोडल्या गेल्या होत्या. स्वतःच्या कष्ट, जिद्द आणि अद्वितीय आवाजाच्या जोरावर आशाताईंनी भारतीय संगीताला जागतिक पातळीवर नेले. त्यांच्या निधनाने संगीतविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली असून त्यांचा स्वर कायम रसिकांच्या मनात घुमत राहील.



**आशा भोसले यांचे निधन**


सायं.दैनिक

www.beedkisan.in

बीड किसान

• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३३१ ▪ रविवार, दि. १२ एप्रिल, २०२६ ▪ पोस्टल दिनांक १३ एप्रिल, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-331 ▪ Sunday 12 April, 2026 ▪ Postal Date 13 April, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2


## मुस्लिम आरक्षण मोर्चाला बजरंग बप्पा,विजयराजे,शफीक भाऊ,राहुल सोनवणेंचा पाठिंबा

# मुस्लिम मतांना जहागिरी समजणाऱ्यांच्या घरी काय भाकरी बांधून आल्यावर ते पाठिंबा देणार का?

**बीड । किसान न्युज**

**कोर्टाने मान्य केलेले शिक्षणासाठी मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण ही केवळ धार्मिक द्वेषातून तो ही आरक्षण भाजपा महाराष्ट्र सरकारने रद्द केले. या आरक्षण रद्द करण्यात आल्याच्या आणि मुस्लिमांच्या कल्याणासाठी आरक्षण लागू करण्याच्या मागणीसाठी सप्तरंग प्रतिष्ठानच्या झेंड्याखाली १७ तारखेला जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खा. बजरंग सोनवणे, आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, यांनी पत्र देऊन पक्षाचा पाठिंबा जाहीर केला. तसेच एमआयएमचे ॲड. शफीक भाऊ यांनी पाठिंबा देत या मोर्चाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले. यामुळे या दोन्ही पक्षांचा पाठिंबा मिळाला आहे. पण बीड जिल्ह्यातील अनेक नेते, नगरसेवक आहेत जे मुस्लिमांच्या मतांना स्वतःची जाहगीरी समजतात मात्र यातील कोणीही अद्याप पुढे आला नसून, त्यांनी पाठिंबा दिला नाही. या लोकांना पाठिंबा द्या म्हणून समाजाने काय यांच्या घरी भाकरी बांधून येऊन विनंती करावी का? यानंतर ते पाठिंबा देतील अशी चर्चा सुरू आहे.**



अनेक शासकीय समित्या आणि आयोगांनी देशातील मुस्लिमांची शैक्षणिक, आर्थिक सामाजिक अवस्था बिकट असल्याचे अहवाल दिले आहेत. या आधारे शासनाने मुस्लिम समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्रात ५ टक्के आरक्षण जाहीर केले. यानंतर या आरक्षणाला विरोध झाला आणि न्यायालयात ही हे प्रकरण गेले, याची सुनावणी होऊन न्यायालयाने मुस्लिमांना शिक्षणात ५ टक्के आरक्षण ठेवावे असे निर्देश दिले होते. मात्र यानंतर सत्तांतर होऊन राज्यात भाजपाचे सरकार आले. त्यांच्या मुस्लिम द्वेषाच्या पॉलिसी तहत या आरक्षणाचा फायद समाजाला होऊ दिला नाही. एकप्रकारे हे आरक्षण वांझोटे ठरले आहे. तरीही मागील काही दिवसांपूर्वी भाजपा महाराष्ट्र सरकारने हे न्यायालयीन लढाईत टिकलेले आरक्षण रद्द केले. या निर्णयाच्या निषेधार्थ मुस्लिम आरक्षण कृती समिती बीडच्या वतीने सप्तरंग प्रतिष्ठानच्या झेंड्याखाली एकत्र येत एल्गार मोर्चाचे दि.१७ एप्रिल रोजी आयोजित केला. याची जोरदार तयारी सुरू असून आरक्षण मागणीसाठी या मोर्चाला समाजांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. या १७ तारखेच्या एल्गार मोर्चाला बीडचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खा. बजरंग सोनवणे यांनी पत्र देऊन पाठिंबा जाहीर केला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे गेवराईचे आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष » पान २ वर

### आरक्षणाच्या लढ्यात मोठ्या ताकदीने सामील व्हा : ॲड.शफीक शेख

**बीड : मुस्लिम समाजासाठी लागू असलेले पाच टक्के आरक्षण रद्द करण्यात आल्याच्या निषेधार्थ १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाच्या पार्श्वभूमीवर एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शफीक शेख यांनी समाजाला एकजुटीचे आवाहन केले आहे. शफीक शेख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, आरक्षणाचा प्रश्न हा केवळ राजकारणाचा विषय नसून तो समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीशी निगडित आहे. राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांचे, युवकांचे आणि भावी पिढीचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे हा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने काढण्यात येणारा हा एल्गार मोर्चा हा समाजाच्या हक्कासाठीचा निर्णायक टप्पा ठरणार आहे. या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन सरकारपर्यंत आपला आवाज पोहोचवणे ही काळाची गरज असून यामुळे या १७ तारखेच्या न्याय हक्कासाठी आणि आरक्षणाच्या लढ्यात ताकदीने सहभागी व्हा असे आवाहन एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ॲड. शफीक भाऊ यांनी केले आहे.**

# कलेक्टरांनी रेल्वेची पाहणी केली अन म्हणाले मे च्या अखेर पर्यंत काम पूर्ण होईल

## कलेक्टर साहेब, परळी हून नगर ला जायला १२ तास लागू नये म्हणजे झालं

**बीड । किसान न्युज**

**बीडकरांच्या जिव्हाळ्याचा आणि ज्याची ५० वर्षांपासून जे स्वप्न पाहत आहेत. ते स्वप्न आता दृष्टीक्षेपात आले असून, परळी-बीड-नगर रेल्वे मार्ग सध्या अंतिम टप्प्यात आले आहे. या रेल्वे मार्गाचे काम मे २०२६ महिना अखेर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यानंतर या मार्गावर रेल्वे धावणार आहे. या कामाची काल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मोजेड ट्रॉलीवरून पाहणी केली. याबाबत संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना केल्या आहेत. राहिलेले काम गतीने सुरू आहे. बीड ते नगर सध्या जवळपास ५ ते ६ तास प्रवासासाठी लागत आहेत. अशीच अवस्था राहिली तर परळी ते नगर १२ तास लागू नये असा टोला लावला जात आहे.**

बीड शहर हे रेल्वेच्या नकाशावर यावे हे बीडकरांचे स्वप्न असून, मागील ५० वर्षांपासून रेल्वे धावताना आणि त्यात बसून प्रवास करण्याची इच्छा मनात घेऊन तो जगत आहे. या मार्गाला मंजुरी मिळवून आणि प्रत्यक्षात काम सुरू होण्यापर्यंत पाठपुरावा करुन दिवंगत नेत्या केशरकाकू क्षीरसागर यांनी पाया रचला आहे. तर त्यापुढे दिवंगत नेते यांनी यासाठी निधी उपलब्ध करुन दिला तर विलासराव देशमुख हे राज्याचे मुख्यमंत्री असताना या परळी-बीड-नगर रेल्वे मार्गासाठी येणाऱ्या खर्चाचा ५० टक्के भार राज्य सरकार उचलणार असा निर्णय घेऊन या प्रकल्पाला गती मिळवून दिली. तर माजी खा. प्रितम मुंडे यांनी या प्रकल्पावर लक्ष » पान २ वर

### वेळ कमी होणार पण कधी?

**यावेळी वेळेची बचत होणार असून, केवळ अडीच तास लागणार असल्याचे सांगितले जात आहे. पण बीड ते नगर सध्याचा वेळ पाहता परळी ते नगर १२ तासच लागतील अशी चर्चा आहे. यामुळे वेळ कमी होणार अशी घोषणा केली तसं काम ही व्हायला हवे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**



# वरुन दट्टा आल्यानंतर गौरव इंगोले यांना शहाणपण सुचले का..!

## माजलगाव तालुक्यातील आठ वाळू घाट बंद

**बीड । किसान न्युज**

**माजलगाव तालुक्यात वाळू घाटांवर मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करुन अवैध उत्खनन करण्यात येत असून, वाळू वाहतूक करणारी वाहने ही जीपीएस ठरवून दिलेल्या मार्गावर न धावता दुसरीकडेच धावत आहेत. तसेच ई-टीपी नियमांचे उल्लंघन असे अनेक ठपके ठेवत उपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी वाळू घाट कंत्राटदारांना दणका दिला असून ८ वाळू घाट बंद केले आहे. यामुळे वाळू माफिया मध्ये खळबळ उडाली आहे.**

तर यानंतर जर वाळू वाहतूक व उपसा सुरू दिसला तर अवैध समजून दंडात्मक कारवाईचा इशारा दिला आहे. मात्र उपविभागीय अधिकारी यांना वरुन दट्टा आल्याने हे सर्व शहाणपण सुचल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. माजलगाव तालुक्यातील काही वाळू घाट येथे मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनन करण्यात येतो, तसेच एका पावतीवर अनेक ट्रिपा करण्यात येत होत्या याबाबत महसूल मंत्री यांच्यापर्यंत तक्रारी आल्या होत्या याची दखल घेत जिल्हाधिकारी यांनी माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांना याची चौकशी करुन यावर कारवाईचे आदेश दिले. या आदेशावरून याप्रकरणाची चौकशी केली असता इंगोले यांना ई-टीपी नियमांचे उल्लंघन, महाखनिज प्रणालीमधील पडताळणीत असे दिसून आले की, वाळू वाहतूक करणारी वाहने जीपीएसनुसार ठरवून दिलेल्या मार्गावर न जाता अन्य ठिकाणी जात होती. याची माहिती महसूल मंत्र्यांपर्यंत पोहोचली आहे. यामुळे माजलगाव तालुक्यातील ८ वाळू घाट बंद करण्याचे आदेश काढून ही कडक कारवाई केली. तसेच यानंतर ही कोणत्याही वाळू घाट कंत्राटदाराने उत्खनन किंवा वाहतूक सुरू ठेवल्यास ती अवैध समजली जाईल आणि संबंधितांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल असा इशारा दिला आहे. या कारवाईमुळे बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्या माफियांचे धाबे दणाणले आहेत. तसेच यांची कमाई होते पण गोरगरिबांना आणखी ही वाळू मात्र महाग घ्यावी लागत असून, त्यांना दिलासा नाही. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात येत आहे.




स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

9850643058

सोने २४ कॅरेट 151,500

२२ कॅरेट 145000

चांदी प्रतिकिलो 244,000


# आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर पेठ बीड पोलिसांची कडक कारवाई

## अवैध दारू विक्री करणाऱ्या ११ जणांना तालुका हद्दीत प्रवेशबंदी

**बीड । किसान न्युज**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव शांततेत व सुरळीत पार पडावा यासाठी पेठ बीड पोलिसांनी कडक प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्या व पोलीस रेकॉर्डवरील ११ इसमांना बीड तालुका हद्दीतून तात्पुरती प्रवेशबंदी करण्यात आली आहे. १३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजल्यापासून ते १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत संबंधित ११ जणांना पेठ बीड पोलिस ठाणे व बीड तालुका हद्दीत प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे. पेठ बीड पोलिस ठाण्याने महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या कलम १४२ (३) बी.एन.एस.एस. अंतर्गत प्रस्ताव सादर करून हा आदेश लागू केला आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कावंत, अपर पोलिस अधीक्षक सविन पांडकर तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, जयंती उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे व कायद्याचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ठेकेदाराचा हलगर्जीपणा तरुणाच्या जीवावर पाटोदा पोलिसांत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

**पाटोदा । किसान न्युज**

रस्त्यावर खोदलेल्या खड्ड्यात पडून एका २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना मार्च महिन्यात घडली आहे. याप्रकरणी सबंधित ठेकेदारावर हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेऊन सदोष मनुष्य वधाचा गुन्हा पाटोदा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. पाटोदा ते जामखेड रोडवर पुलाच्या कामासाठी खोदलेल्या खड्ड्यात पडून २५ वर्षीय शुभम प्रभाकर नेटके (रा. आसरडोह, ता. धारुर) या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. धनगर जवळका येथे बी.आर.एन. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीमार्फत पुलाचे काम सुरू आहे, मात्र तिथे कोणत्याही प्रकारचे सुरक्षा फलक, बॅरिकेटींग किंवा रिफ्लेक्टर लावलेले नव्हते. २३ मार्च रोजी पहाटे शुभम आपल्या दुचाकीवरून जात असताना अंधारात खड्डा न दिसल्याने तो थेट खड्ड्यात कोसळला आणि गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. कंपनीचे गुत्तेदार संजयकुमार गुप्ता आणि लवकुश चौधरी यांना धोक्याची कल्पना असूनही त्यांनी सुरक्षा उपाययोजना केल्या नाहीत, असा ठपका ठेवत अक्षय नेटके यांच्या फिर्यादीवरून पाटोदा पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे.

# खाजगी सावकारकीचा बीडमध्ये काळा चेहरा उघड

## ४० टक्के व्याजाने आकारले तर पूर्ण रक्कम देऊन ही छळ, पत्नीच्या गळ्यातील दागिने वरबाडून नेल्याचा आरोप

**बीड । किसान न्युज**

बीड शहरातील इस्लामपुरा भागात सावकारीच्या त्रासाला कंटाळून एका नागरिकाने पोलिसांकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ अंतर्गत संबंधित व्यक्तीवर कारवाई करावी, अशी मागणी या अर्जातून करण्यात आली आहे. यात पीडित याने ४० टक्के व्याज लावल्याचा आणि पूर्ण रक्कम देऊन ही छळ करून पत्नीच्या गळ्यातील दागिने वरबाडून नेल्याची तक्रार केली. तक्रारदार शेख अखील शेख युसुफ रा. इस्लामपुरा, बीड यांनी दिलेल्या पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मी जून २०२५ मध्ये माझ्या मामाचा मुलगा शेख अकबर यांच्या कडून १ लाख रुपये ४० टक्के व्याजदराने घेतले होते. ठरल्याप्रमाणे त्यांनी दरमहा ४०,००० रुपये दर महिन्याला देण्याचे ठरले होते त्या नुसार जुलै व ऑगस्ट महिन्यात प्रत्येकी ४० हजार रुपये व्याज दिल्यानंतर सप्टेंबर ते डिसेंबर दरम्यान दर आठवड्याला १० हजार रुपये दिल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये तक्रारदाराने १ लाख रुपयांची मूळ रक्कम शेख एजाज शेख काळू, शेख मुस्ताख शेख बशीर व माझी पत्नी यांच्या समोर व उपस्थितीत परत केल्याचा दावा केला आहे. मात्र, संपूर्ण रक्कम देऊनही संबंधित सावकाराकडून वारंवार पैशांची मागणी केली जात असून, » पान २ वर